Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,**
**दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,**
**www.unishivaji.ac.in**

# विद्यार्थी विकास विभाग

**Dr. S. G. Ghane**
**Director, Students' Development**
**Phone – (0231) 2609175, 2609475**
**Email: dsw@unishivaji.ac.in**

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/ 532 दि. १७/०८/२०२६

प्रति,
**मा. प्राचार्य/प्राचार्या,**
सर्व संलग्न महाविद्यालये व सर्व मान्यताप्राप्त शिक्षण संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :– जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सव २०२६–२०२७ प्रवेशिका भरणेबाबत.**

महोदय/महोदया,

शिवाजी विद्यापीठाचा ४६ वा युवा महोत्सव २०२६–२०२७ द्विस्तरीय पध्दतीने आयोजित केला जाणार आहे. जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सव आयोजन नमुद केलेल्या तारख्यांना करण्यात येणार आहे. यजमान महाविद्यालयांची नावे आपणास नंतर कळविण्यात येईल.

| अ. क्रं | तपशिल | तारीख |
|---|---|---|
| १. | सांगली जिल्हास्तरीय युवा महोत्सव | दि. २७/०९/२०२६ |
| २. | कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सव | दि. २९/०९/२०२६ |
| ३. | सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सव | दि. ०१/१०/२०२६ |
| ४. | मध्यवर्ती युवा महोत्सव | दि. ०६/१०/२०२६ ते दि. ०९/१०/२०२६ |

**तरी आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा संघ बनवून युवा महोत्सवामध्ये सहभागी व्हावे. या अनुषंगाने खालील मुद्दे विचारात घ्यावेत.**

१. जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठीच्या प्रवेशिका **सोमवार दि. ०७/०९/२०२६** रोजी **रात्री १२.०० वाजेपर्यंत Online** भरावयाच्या आहेत.
२. महाविद्यालयांनी सहभागी होणाऱ्या कलाप्रकारांसाठी **प्रवेशिका Online भरावयाच्या** आहेत. Hard copy आलेल्या प्रवेशिकांचा विचार केला जाणार नाही.
३. प्रत्येक वैयक्तिक स्पर्धेसाठी रु. १००/– व प्रत्येक सांघिक स्पर्धेसाठी रु. २००/– इतके प्रवेश शुल्क भरावयाचे आहे. महाविद्यालयांनी सहभागी सांघिक व वैयक्तिक स्पर्धांचे शुल्क Payment Gateway ने Online भरणेचे आहे.
४. जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवाचे वेळापत्रक सर्व महाविद्यालयांना यथावकाश ई–मेलद्वारे पाठविणेत येईल.
५. जास्तीत–जास्त विद्यार्थ्यांना युवा महोत्सवात सहभागी होता यावे यासाठी महाविद्यालयांनी त्यांच्या परीक्षांचे वेळापत्रक माहे सप्टेंबर, २०२६ चा शेवटचा आठवडा आणि माहे ऑक्टोबर, २०२६ चा पहिला आठवडा हा कालावधी वगळून निश्चित करावे.

**जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सव प्रवेशिका भरणेबाबतची ऑनलाईन लिंक खालीलप्रमाणे आहे.**

http://sukapps.unishivaji.ac.in/onlineaffiliation/#/login

१. सन २०२६—२०२७ जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी उपरोक्त लिंकवर क्लिक करावे व Online प्रवेशिका आपले महाविद्यालयास विद्यापीठाचे Affilation विभागाकडून देण्यात आलेल्या Login ID व Passward चा वापर करुन Affilation पोर्टल Open करावे. त्यानंतर सदर पोर्टलच्या डाव्या बाजूस असणाऱ्या Youth Festival/Avishkar या Icon ला क्लिक केल्यानंतर Youth Festival ला क्लिक करा. त्यानंतर सदर युवा महोत्सव Online प्रवेशिका भरणेचा फॉर्म Open होईल.

२. सदरचा फॉर्म Open झाल्यानंतर प्रथम आपले संघाची संपूर्ण एकत्रित माहिती भरावी. सदरची माहिती भरुन झाल्यानंतर Submit बटनावर क्लिक करावे व त्यानंतर Lock बटन क्लिक करावे व त्यानंतर स्पर्धानिहाय Online फॉर्म भरुन Online Payment करावे.

३. जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवावेळी आयोजक महाविद्यालयामध्ये नोंदणी करताना सोबत दिलेल्या नोंदणी तक्त्यांमध्ये संपूर्ण संघाची नोंदणी करुन सदर नोंदणी तक्ता यजमान महाविद्यालयामध्ये जमा करावी.

**४. कलाकार व विद्यार्थी साथीदार यांचे शिकत असलेले वर्ग व जन्मतारीख प्रवेशिकेत नोंदविणे आवश्यक आहे. तसेच स्पर्धे ठिकाणी सर्व विद्यार्थ्यांचे जन्म तारखेचे पुरावे सादर करणे आवश्यक आहे. (दहावी प्रमाणपत्र/जन्मदाखला/शाळा सोडलेचा दाखला साक्षांकित झेरॉक्स प्रत)**

**५. जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवावेळी आयोजक महाविद्यालयामध्ये नोंदणी करतेवेळी ऑनलाईन पध्दतीने नोंदणी केलेली कलाप्रकारनिहाय यादी सोबत खाली नमुद कागदपत्रांची झेरॉक्स प्रत सादर करणे आवश्यक आहे.**

**अ. सहभागी विद्यार्थ्यांचे ओळखपत्र** (चालु वर्षाची नोंदणीसह मा. प्राचार्य यांच्या सही असणे आवश्यक)
**ब. चालू वर्षातील प्रवेश पावती**
**क. दहावी बोर्ड प्रमाणपत्र/जन्मदाखला**
**ड. गतवर्षीच्या निकालाची प्रत**

६. काही महाविद्यालये बक्षीस मिळविण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात विद्यार्थ्यांचा प्रवेश करतात व युवा महोत्सव स्पर्धेमध्ये बक्षिस मिळाल्यानंतर सदर विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करतात / सदर विद्यार्थी महाविद्यालयात नियमित नसतो. त्यामुळे जर अशा प्रकारे महाविद्यालयाने बक्षीस मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवेशित केले आहे असे निदर्शनास आले तर संबंधित महाविद्यालयावर विद्यापीठ नियमानुसार योग्यती कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

महत्त्वाची सुचना :— **युवा महोत्सव समितीच्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे जी महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२६ — २०२७ मधील युवा महोत्सव स्पर्धेमध्ये सहभाग घेणार नाही अशा महाविद्यालयाकडे युवा महोत्सव शुल्कापोटी प्रती विद्यार्थी रु. ४०/— प्रमाणे शिल्लक असणारी रक्कम प्रथम सत्र समाप्तीपुर्वी विद्यापीठाखाती जमा करावयाची आहे. जर प्रथम सत्र समाप्तीपुर्वी रक्कम जमा केली नाही तर सदर रक्कमेवर ८% व्याजासह होणारी एकूण रक्कम विद्यापीठ खाती जमा करावी लागेल.**

तरी उपरोक्त सर्व मुददे अवलोकनी घेवून जास्तीत जास्त महाविद्यालयांनी युवा महोत्सवामध्ये सहभाग नोंदवावा हि विंनती.

कळावे,

आपला विश्वासू

17/08

संचालक
विद्यार्थी विकास

सोबत :

युवा महोत्सव नियमावली, ऑनलाईन फॉर्म भरावयाच्या स्टेप्स, सहभागी कलाकार नोंदणी तक्ता